# राजा राममोहन रॉय-सामाजिक सुधारणा मानवतावाद-प्रबोधन

*प्रा. डॉ. सौ. लक्ष्मी निळकंठराव धोत्रे

**शोधपत्र-इहितास**

खऱ्या अर्थाने भारतामध्ये प्रबोधन युगाला सुरुवात झाली. ती १९ व्या शतकाच्या पुर्वार्धात झाली. प्रबोधन खरे म्हणजे युरोपमध्ये आपल्या आधी किती तरी वर्ष झालेली होती, यामुळेच भारत व आशियाई राष्ट्र पिछाडीवर राहण्याचे हे महत्त्वपूर्ण कारण आहे. प्राचीन भारतीय संस्कृतीतील चांगले मुल्य टिकविणे आवश्यक होते म्हणूनच तत्कालीन कांही विचारवंतानी आधुनिक पाश्चात्य विचारश्रेणीचा स्वीकार करित असतांना भारतीय मुल्यांशी सांगड घालण्याचा आटोकाट प्रयत्न केला अशामध्ये अग्रनीय विचारवंत म्हणजे राजा राममोहन रॉय हे होत. राजा राममोहन रॉय यांचा जन्म बंगालमधील राधानगर येथे २२ मे १७७२ रोजी झाला. राजा राममोहन रॉय यांना इंग्लंडच्या राजाकडे दिल्लीच्या बादशहाने आपली बाजू मांडण्यासाठी प्रतिनिधी म्हणून पाठविले, तेंव्हा त्यांना बादशहाने 'राजा' हा किताब दिला. राजा राममोहन रॉय यांचे वडील बंगालमधील एक सदन जमीनदार होते. राजा राममोहन रॉय यांना पारशी आणि अरबी भाषा अवगत होती. त्यांचा इस्लामी धर्म, इतिहास आणि तत्त्वज्ञान या विषयांचा गाडा अभ्यास होता. त्यातील 'सुफी' तत्त्वज्ञानाचा त्यांच्या मनावर प्रभाव पडला. बनारस येथे त्यांनी संस्कृत भाषेचा अभ्यास केला. ते मुर्तीपुजा व अनेकेश्वरवाद यांच्या विरोधी होते. त्यांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. हिंदू धर्मातील सर्व अनिष्ठ रुढी, परंपरा दूर करण्याचा त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केला. पुढे त्यांचे व वडिलांचे धार्मिक मतभेदामुळे त्यांना घर सोडावे लागले. ते तिबेटला गेले. तेथे बौध्द धर्माचा अभ्यास केला. १८१८ मध्ये त्यांनी 'सतीबंदी' रुढ चळवळ सुरु केली व त्यांच्या या अधक प्रयत्नामुळे १९२९ मध्ये सतीची चाल बंद करणारा कायदा पारित झाला म्हणून हे वर्ष भारताच्या इतिहासात सामाजिक, संस्कृतीक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे वर्ष मानले जाईल. राजा राममोहन रॉय यांच्या धार्मिक, सामाजिक सुधारणेच्या चळवळीचा तो प्रारंभ होता. रॉय यांनी इंग्लिश भाषेचा त्याचबरोबर हिब्रु, ग्रीक व लॅटीन या भाषेंचा अभ्यास केला. युरोपमधील उदारमतवादी चळवळीची माहिती झाली, त्यातून ते उदारमतवादी बनले. भारतात आधुनिक पाश्चात्य शिक्षण पध्दतीचा प्रसार व्हावा, आधुनिक विज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि तत्त्वज्ञान यांचे भारतीयांना शिक्षण दिले जावे म्हणून त्यांनी प्रयत्न केले. धर्म सुधारक व समाजसेवक या दोन्ही दृष्टीकोनातून राजा राममोहन रॉय यांचे विचार आणि कार्य प्रबोधनयुगाचे द्योतकच आहे. त्यांच्यापासूनच भारतात राजकीय विचारांचा प्रारंभ झाला.

अनेक शतकापासून भारतात सतीची अमानुष आणि क्रुरुर प्रथा चालू होती. परंतु याविषयी कोणत्याही महान व्यक्तीला वा तत्कालीन त्या-त्या काळातील, समाजातील या वाईट चालीरितीबद्दल नाखंत व खेद होता. याचा अर्थ म्हणजे स्त्रीला कफलक समजने हाच होता. मनुष्याला कांहीही करुन मरण नको वाटते, परंतु सतीची चाल म्हणजे त्या स्त्रीचा दिवसाढवळ्या खुनच आणि तोही उघड डोळ्यांनी आणि वर्षानुवर्षे ही चाल या देशात चालू होती. याचा अर्थ भारत व भारताची संस्कृती मोठी म्हटली जाते. त्यावर ही घटना अमानवी वाटत नाही का ? निश्चितच ही शब्दाने कितीही निंदली तरी ती कमीच वाटते. अगदी कॅन्सर व इतर हाताची व पायाची सर्व बोटे जरी झडली तरी त्या महारोग्यास मरावे वाटत नाही. परंतु सतीच्या चालीने या देशातील लाखों स्त्रीया झळून खाक झ्ााल्या. अशा या अमानुष कृत्याकडे राजा राममोहन रॉय सारख्याच दृष्टा युग प्रवृतकच आवाज उटवू शकला.

भारतात स्त्रीयांची परिस्थिती अतिशय वाईट होती. बालविवाहाची प्रथा सर्व दूर होती. स्त्रीयांना शिक्षणापासून मुद्दामच दूर ठेवण्यात आले होते. घर हेच स्त्रीचे कार्यक्षेत्र होते. कुटूंबात स्त्रीयांना दुय्यम स्थान होते व आजही आहेच. कुटूंबात स्वत:चे व्यक्तीमत्त्व स्त्रीयांना नव्हते व आजही नाही. केवळ मुठभर वा हातावर मोजता येईल एवढया स्त्रीया सुशिक्षीत झाल्या म्हणजे सारा भारत सुशिक्षीत होत नाही व झाला नाही. पतीशिवाय स्त्रीचे जीवन अर्थहीन मानले जाईल. पुरुषांना अनेक स्त्रीयांशी विवाह करता येत होता. पुरुष प्रदान संस्कृतीने सतीच्या पध्दतीला विरोध न करता मान्यताच दिली होती. राजा राममोहन रॉय यांना या पध्दतीत वा प्रथेबद्दल प्रचंड चिड वाटली आणि या पध्दतीला त्यांनी कसून विरोध केला. त्यांनी सतीच्या चालीविरुध्द लोकभावना जागृत करण्याचे कार्य अविरतपणे केले. त्यामुळे सतीच्या अमानुष प्रथेविरुध्द लोकमत तयार होत गेले व सरकारला सतीबंदीचा कायदा करणे सोपे गेले. यात विल्यम बेटींग यांचा सिंहाचा वाटा आहे. धार्मिक रुढी, परंपरा अपरिवर्तनीय नसतात. त्या परिस्थितीनुसार बदलाव्या लागतात व नष्ट कराव्या लागतात. याची हिंदू समाजाला जाणीव झाली आणि समाज सुधारण्याचा मार्ग मोकळा झाला. तरी कायदा आजही अस्तित्वात असल्याने कांही कर्मकांडवादी लोक राजस्थानमध्ये हा हिडीस प्रकार करण्याचा प्रयत्न करतात. परिणामी त्यांना या कायदयानुसार जेलची हवा खावी लागली आहे. स्त्री स्वातंत्र्य आणि तिच्यावरील अन्याय दूर करण्याच्या व त्याविषयी वैचारीक मांडणी करुन समाज प्रबोधनाचे कार्य राजा राममोहन रॉय यांनी केले. त्याअर्थाने, राजा राममोहन रॉय हे हिंदू समाज सुधारणेच्या चळवळीचे आदय प्रनेते होते.

पुर्वी हिंदू धर्माच्या तत्त्वाप्रमाणे समुद्र पर्यटनास विरोध होता. हा संकुचित विचार हिंदुस्थानी जनतेच्या विकासाला मारक आहे म्हणून स्वत: राजा राममोहन रॉय यांनी जाणीवपूर्वक समुद्र पर्यटन केले व परदेशी पोहचले म्हणजे सामाजिक सुधारणा विषयांचे फक्त विचारनामा न मांडता त्या विचारानुसार स्वत: कृती केली. हिंदू धर्मातील प्रचलित प्रथेनुसार स्त्रीयांना मालमत्तेचा हक्क नव्हता.

* इतिहास विभाग प्रमुख, श्रीमती सुशिलादेवी देशमुख महिला महाविद्यालय, लातूर

तिच्या पतीच्या निधनानंतर त्याच्या मालमत्तेचा हक्क फक्त मुलाला प्राप्त होत होता, पत्नीला मिळणारा वाटा नगन्य स्वरुपाचा होता. स्त्रीयावरील या अन्यायाविरुध्द रॉय यांनी आवाज उटवला व मुलाबरोबर पत्नीला देखील वाटा मिळाला पाहिजे असे प्रतिपादन केले. त्यामुळे स्त्रीयांवरील अन्याय व जाच कमी होण्यास मदत झाली. स्त्रीयांची अज्ञानातून मुक्तता व्हावी म्हणून स्त्री - शिक्षणाचा पुरस्कार रॉय यांनी केला. राजा राममोहन रॉय हे एकेठिकाणी म्हणतात, 'स्त्रीयांच्या शारीरिक दुर्बलतेचा व असहाय्यतेचा फायदा घेऊन स्त्रीला समाजात अतिशय निकृष्ट स्थान देण्याचा प्रयत्न पुरुषाने केला.' वेद, उपनिषेध्द, भगवतगीता या मौलीक ग्रंथाचा आधार घेऊन सतीची चाल किती अमानुष आहे हे दाखविण्याचा प्रयत्न केला आणि सामाजिक व नैतिक दृष्टीतून स्त्री मुक्तीचे महत्व पटवून दिले व सर्वसामान्य माणसाला पटतील, आत्मसाथ करता येतील असे पुरोगामी सुधारणेचे विचार रॉय यांनी मांडले.

हिंदू धर्मातील जातीय व्यवस्थेविरुध्द रॉय यांनी आवाज उटविला आणि व्यक्तीचे स्थान हे जन्मावरुन ठरत नसून त्याच्या कर्मावर आणि गुणावर ठरावे म्हणून समतेसाठी सामाजिक, एकात्मतेसाठी व जातीभेद कमी व्हावा म्हणून मौलीक विचार मांडले. राजा राममोहन रॉय हे मुलत: धार्मिक व सामाजिक सुधारक होते. भारतात धार्मिकतेचे गहन प्रश्न होते. मनुष्य धार्मिकदृष्टया स्वतंत्र झाला पाहिजे असे त्यांना वाटते. जुन्या अंधश्रध्दा नष्ट झाल्या पाहिजेत, त्यासाठी पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे म्हणजे नवीन ज्ञानाची क्षितिजे भारतीयांनी केली पाहिजेत. यात सर्व मानव समाजाचे कल्याण त्यांना अभिप्रेत होते. त्यांचे एक महत्त्वाचे विधान म्हणजे 'ज्या प्रकारच्या धार्मिक परंपरांना हिंदू लोक चिटकून आहेत, त्यामुळे त्यांचे राजकीय हित व धार्मिक हित साध्य होत नाही, सामाजिक एकात्मता निर्माण होत नाही यामुळे समाज कोणतेही महत्त्वाचे कार्य हाती घेण्याच्या दृष्टीने कुचकामी आहे. मुर्तीपुजा आणि त्याचे अवलंबन, दाभीकपणा हा सामाजिक विकासाचा शत्रु आहे. राजा राममोहन रॉय हे निष्ठावंत एकेश्वरवादी होते. संपूर्ण विश्वाचा कर्ता व करविता एकच परमेश्वर आहे, ही श्रध्दा राजा राममोहन रॉय यांच्या धार्मिक विचाराचे मुख्य सुत्र होते म्हणून त्यांनी मुर्ती पुजेला विरोध केला. त्यातील दाभीकपणा स्पष्ट करुन जनतेला एक परमेश्वराच्या निर्गुण भक्तीचा संदेश दिला. देव - देवतांची पुजा - अर्चा पध्दतीवर टिका केली. सर्व धर्माबाबत रॉय संहिष्णुतावादी होते. सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी राजा राममोहन रॉय बद्दल व्यक्त केलेले मत म्हणजे, 'भारतातील सनदशिर चळवळीचे जनक'. जनतेत राजकीय हक्कांची जाणीव निर्माण करणारे दृष्टा नेता म्हणजे राजा राममोहन रॉय होय. राजा राममोहन रॉय यांनी व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि देशाचे स्वातंत्र्य हे दोन्ही विचार अत्यंत प्रभावीपणे मांडले. कोणताही देश परदाशात राहू नये ही त्यांची कल्पना होती, त्या दृष्टीने त्यांनी वसाहतवादाला विरोध केला. व्यक्ती स्वातंत्र्य हा कोणत्याही समाजाचा प्राण असतो असा रॉय यांचा दृष्टीकोन होता. व्यक्ती केवळ शरीराने स्वातंत्र्य असून चालत नाही तर ती मनाने देखील स्वातंत्र्य असावे लागते. केवळ विचार करण्याचे स्वातंत्र्य व्यक्तीला असून उपयोगी नाही, तर त्यांचा कृती करण्याचेही स्वातंत्र्य हवे असे ते म्हणत. विचार आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य हा वेद आणि उपनिषदातील हिंदू तत्त्वज्ञानाचा गाभा होय. कोणत्याही धर्माची सक्ती ही कोणत्याही व्यक्तीवर केली जावू नये. प्रत्येकाला आपापल्या स्वइच्छेने धर्माचरण करता आले पाहिजे. व्यक्तीस मारक ठरतील अशा प्रकारचे बंधने शासनाने टाकू नयेत. याबाबत त्यांनी सहिष्णू व उदारमतवादाचा पुरस्कार केला. निरक्षरतेमुळे भारताचे खुप नुकसान झाले आहे. अज्ञानामुळे विकास पूर्णपणे खुंटतो. शिक्षणामुळे व्यक्तीत जागृती येते. देशापुढील व समाजापुढील प्रश्न आणि समस्यांचे तो चांगल्या प्रकारे आकलन करु शकतो. शिक्षणातून उपजीविकेचे साधन उपलब्ध होऊ शकते. शिक्षणामुळे नव्या प्रेरणा व ज्ञान प्राप्त होवून भारतीय व्यक्ती रुढी व अंधश्रध्देमधुन पुर्णपणे मुक्त होईल. म्हणून शैक्षणिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करुन ब्रिटिश शासनाच्या मदतीने शैक्षणिक प्रसार करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. राजा राममोहन रॉय यांचा कंपनीवर विश्वास नव्हता, परंतु ब्रिटिश पार्लमेंटवर त्यांचा विश्वास होता. कायदा तयार करतांना आवश्यक ती पार्श्वभूमी ब्रिटिश संसदेला प्राप्त होईल असा विचार त्यांनी मांडला. कायदयाची अधिराज्याची कल्पना (Rule of Law) हा महत्त्वाचा विचार रॉय यांनी मांडला. सर्वधर्मीयांना समान कायदा लागू करण्यात यावा, हा भौतिक विचार त्यांनी दिला. हे विचार आजही अतिशय महत्त्वाचे आहेत. अनिष्ठ चालीरिती, अनिष्ठ परंपरा कायदयाने नष्ट केल्या पाहिजेत, परंतु रॉय म्हणतात राज्यस्थिरतेच्या दृष्टीने सर्वच रुढी व परंपरा कायदयाने नष्ट करता येत नाहीत, तसे करणेही ईष्ट ठरणार नाही. रॉय यांनी इंग्लंडचा न्याय आणि कायदा याबाबत आपले विचार व्यक्त केले, ते उदारमतवादी आणि व्यक्ती स्वातंत्र्याचे कठर पुरस्कर्ते होते. त्यादृष्टीने न्यायव्यवस्था त्यांना अभिप्रेत होती.

राजा राममोहन रॉय यांच्या काळात भारतात पारंपारिक शिक्षण पध्दती होती. इंग्रजांच्या आगमनामुळे भारतात पाश्चात्य पध्दतीचे शिक्षण द्यावे ही पध्दत हळूहळू रुढ झाली. याबाबत त्यांनी जन्मतात जागृती लिखाणातून घडवून आणली. व्यक्तीने स्वत:ची मालमत्ता जोपासावी या मताचे रॉय होते. रॉय यांनी आर्थिक शोषणाला विरोध केला आणि सामान्य शेतकरी जाचातून मुक्त झ ालाच पाहिजे असे मत प्रदशित केले. त्यांचे शेतकरी व कामगारावर प्रेम होते म्हणून जमीनदार पध्दतीला त्यांनी विरोध केला. राजा राममोहन रॉय हे उच्चकोटीचे मानवतावादी आणि आंतरराष्ट्रीय दृष्टीकोन बाळगणारे विचारवंत होते. ते राष्ट्रवादी होते. परंतु आंतरराष्ट्रीयवादी अधिक होते. त्यांचा वैश्विक सद्भावावर आढळ विश्वास होता. त्यांना सर्व मानवसृष्टी एक कुटूंब वाटत होते. रॉय यांचे विचार फक्त बंगालपुरतेच मर्यादित नसून संपूर्ण देशासाठी होते. त्याचप्रमाणे धार्मिक बाबतीत त्यांची दृष्टी संकुचित नव्हती. भारतातील सतीची चाल बंद व्हावी, स्त्रीला पुरुषाप्रमाणे समान हक्क मिळावे, विधवा स्त्रीला प्रतिष्ठा व स्वाभिमानाने जगता यावे, भारतीयांना शासनातील अधिकाधिक नौकऱ्या मिळाव्यात, शासनाने उदारमतवादी धोरण ठेवावे, सामाजिक अंधश्रध्दा व अमानुष रुढी - परंपराचा समाजाने त्याग करावा या सर्व बाबतीत रॉय यांनी केलेले प्रयत्न त्यांची मानवतावादी दृष्टी स्पष्ट करतात.

विश्वबंधुत्वाच्या भावनेतुन जेंव्हा फ्रान्समध्ये परकीय नागरिकांच्या प्रवेशावर बंदने घालण्यात आली, तेंव्हा त्या धोरणाला विरोध करणारे पत्र त्यांनी फ्रान्स सरकारला लिहिले व त्यात 'सर्व मानवजात हे एक मोठे कुटूंबच असून विविध राष्ट्रे आणि मानवी समुह या त्याच्या केवळ शाखा आहेत.' राजा राममोहन रॉय यांनी विपुल लेखन केले. त्यांना विविध विषयांची आवड होती. धार्मिक - अध्यात्मिक तत्त्वचिंतन हा त्यांचा पिंड होता. त्यांचे लिखाण धार्मिक स्वरुपाचे आहे. 'तौफातुल मुसाहिदिन' हा त्यांच्या तत्वचिंतनातून साकार झालेला पहिला ग्रंथ 'मिरल-उल-अखबार' हे नियतकालिक त्यांनी चालविले. १८२८ मध्ये राजा राममोहन रॉय यांनी ब्राह्मोसमाजाची स्थापना केली. ते धार्मिक वृत्तीचे असल्यामुळे अनिष्ठ चालीरीती, अंधश्रध्दांना त्यांचा कट्टरविरोध होता. राजा राममोहन रॉय हे असामान्य दर्जाचे प्रज्ञावंत होते. त्यांची प्रचंड बौध्दीक कुवत होती. ते उदार व व्यापक मनोवृत्तीचे होते. त्यामुळे त्यांच्या कर्तुत्वाची अनेक पैलू होते. त्यांचे सामाजिक, राजकीय चळवळीतील कार्य भविष्याला दीपस्तंभासारखे मार्गदर्शक

ठरणारे आहे हे निर्विवाद. राजा राममोहन रॉय हे आधुनिक भारताचे शिल्पकार व जनक होते असे मुजुमदार यांनी म्हटले आहे. आधुनिक राजकीय विचारांच्या इतिहासात त्यांचे स्थान पाश्चात्य राजकीय विचारात जसे ॲरिस्टॉटलच्या विचारांना स्थान आहे. ते आधुनिक भारताचे जनक होते.

भारतात सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय या सर्व क्षेत्रात आधुनिकीकरणाचा आग्रह त्यांनी धरला. मुर्तीपुजेला विरोध, दाभीकपणाला विरोध केला. सामाजिक क्षेत्रात सतीची चाल, बालविवाह पध्दत, बहुपत्नी पध्दतीला विरोध केला. राजकीय क्षेत्रात समानता, स्वातंत्र्य आणि मानवी हक्काचा पुरस्कार केला. या विचार व कार्यातून आधुनिक दृष्टी स्पष्ट होते. राजा राममोहन रॉय यांच्या कार्यातूनच भारतात आधुनिक शिक्षण व आधुनिक उद्योगांना चालना मिळाली. पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार झाला. विश्व विद्यापीठाची स्थापना झाली. राजा राममोहन रॉय हे भारतीय प्रबोधनाचे आदयप्रवर्तक होते. राजा राममोहन रॉय यांनी आपल्या विचारातून प्रबोधनाचे बीजारोपण केले होते. यांचा काळ अधोगतीचा, अज्ञानाचा, पारंपारिकतेचा व अंधश्रध्देचा होता. त्या पार्श्वभूमीवर राजा राममोहन रॉय यांनी नवा मार्ग शोधून दिला. त्यांनी देशाला जणु प्रकाशाचा मार्ग दाखविला. रॉय यांच्यावर युरोपातील प्रगतीचा, नव्या विचारांचा प्रभाव होता. पाश्चात्याची वैज्ञानिक दृष्टी भारतीयांनी स्वीकारावी असे त्यांना वाटत होते. म्हणून स्वामी विवेकानंद यांनी रॉय यांना 'नवचैतन्य प्राप्त झालेला नव-भारताचा पहिला मानव' असे संबोधले आहे.

भारतातील सामाजिक सुधारणा चळवळीचे आदय प्रवर्तक रॉय होते. अंधश्रध्देत अडकलेला समाज त्यांनी पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावातून मुक्त केला. व्यापक विचारांची दृष्टी दिली. जातीभेद, श्रेष्ठ-कनिष्ठता हा भेदाभेद कमी केला. अनिष्ठ सामाजिक रुढी, परंपराविरुध्द जागृती घडवून आणली आणि तेथेच न थांबता सरकारला या अनिष्ठ चालीरिती विरुध्द कायदा करण्याचा सल्ला दिला. त्यामुळेच सतीबंदीचा कायदा झाला. व भारतीय स्त्री सतीच्या या प्रथेपासून मुक्त झाली. राजा राममोहन रॉय हे महान मानवतावादी होते. आंतरराष्ट्रीय शांतता, विश्वबंधुत्वाचे विचार त्यांनी मांडले व तशी कृती देखील केली. त्यांच्या विश्वबंधुत्वाच्या व मानवतावादी विचारामुळे त्यांच्या कार्याला अलौकिकत्वाचा परिस्पर्श झालेला आहे. व्यक्ती स्वातंत्र्य, मानवतावाद, बुध्दीनिष्ठा, शास्त्रीय दृष्टी इत्यादी आधुनिक कसोटयावर राजा राममोहन रॉय यांचे विचार उतरतात. श्रीमती ॲनी बेझंट म्हणतात, 'रॉय हे एक असामान्य लोहपुरुष होते, त्याचप्रमाणे आजीवित शक्तीचे प्रतिक होते.' म्हणून प्रबोधनाच्या क्षितिजावरचा एक दैदीप्यमान तारा म्हणून राजा राममोहन रॉय यांची गणना निश्चित होते. त्यांचे विचार सदैव भारतीयांच्या स्मरणात राहतील. विशेष करुन भारतीय स्त्रीने त्यांच्या ऋणात राहणे पसंद करावे हे माझे मत आहे.

सोफी डॉन्सन कॉलेट यांच्या मते, भारताच्या इतिहासात राजा राममोहन रॉय यांचे स्थान एक प्रचंड, बळकट सेतूचे आहे. हा सेतू भारताच्या अमाप इतिहासाला अनंत भवितव्याशी जोडतो. रविंद्रनाथाच्या पुढील शब्दात या प्रकरणाचा समारोप करणे अत्यंत औचित्यपूर्ण ठरेल असे वाटते, 'रॉय यांनी भारतात आधुनिक युगाचा प्रारंभ केला, हा देश स्वत:ची जाणीव विसरला होता आणि त्यामुळे अतार्किकतेचे ओझे त्यांच्या शिरावर येऊन पडले होते. परिस्थितीने तो गुलाम बनला होता. सामाजिक चालीरीती, राजकारण, धर्म व कला या सर्व क्षेत्रात जुन्या परंपरेचा वरचष्मा झाला होता. अशा वेळी रॉय यांनी त्यांचे चैतन्यशील व्यक्तित्व व तडजोड न करणारा स्वातंत्र्यवाद यांच्या योगाने आपल्या देशाच्या सर्जनशीलतेचे महत्त्व जाणले आणि त्याला स्वत्वाची ओळख करुन देण्याचा कष्टाप्रद मार्ग स्वीकारला.

भारतीय प्रबोधनाचे प्रतीक, विश्वधर्माचा प्रवर्तक, वृत्तपत्रव्यवसायाचा मुक्तीदाता, पूर्व-पश्चिमेला व भूत-भविष्याला जोडणारा सेतू, मानवतेचा पुजारी, आंतरराष्ट्रीय सहजीवनाचा उद्‌गाता - अशा कित्येक विशेषणांनी राजा राममोहन रॉय हे नांव आधुनिक भारताच्या इतिहासात अजरामर ठरले आहे. रॉय यांच्या सामाजिक, धार्मिक व राजकीय विचारांना व्यापून उरणाऱ्या मानवताप्रेमामुळे व अमर्याद सहिष्णुतेच्या प्रेरणामुळे त्यांच्या संपूर्ण वैचारीक विस्तारात एक अखंड सुसंगती व निश्चित तत्त्वज्ञानाची दृढ बैठक आढळून येते हे फारच थोडया विचारवंतांच्या लेखनात दिसते.

## सन्दर्भ ग्रन्थ

१) आधुनिक भारतातील राजकीय विचार - डॉ. भास्कर लक्ष्मण डोळे २) आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत-प्राचार्य डॉ. पी. डी. देवरे, प्रा. डॉ. एस. एम. विसपुते, प्रा. डॉ. दिलीपसिंह एस. निकुंभ, प्रा. डॉ. सुनंदा ठाकरे (पाटील)